| ग्राम चैतन्य | ग्रामपंचायत आळे<br>तालुका जुन्नर<br>जिल्हा पुणे<br>फोन नंबर २१३२ २६३१०३ | प्रोसेडींग<br>सभेच्या कामकाजाच्या वृत्तांताचे पुस्तक | सुचना : सभेस हजर असलेल्या सभासदांची नावे गरजेप्रमाणे व जरूरीप्रमाणे स्वतंत्र कागदावर लिहून ती या कामकाजास जोडावीत. | पान नंबर<br>१ |
|---|---|---|---|---|

१) सभेचा प्रकार : ग्राम सभा
२) सभेचा क्रमांक : १
३) सभेचा दिनांक : २०/०५/२०१३
४) सभेची वेळ : १०.००
५) सभेचे स्थळ : श्री. मारुती मंदिर आळे

६) सभेस कोणी सन्माननीय व्यक्ती अगर अधिकारी हजर असल्यास त्यांची नावे (हुद्दयासह) : -

७) सभेचे अध्यक्ष : मा.श्री. उदय शिवाजी भुजबळ - उपसरपंच

८) सभेस हजर असलेल्या सभासदांची नावे :

| विषय क्र. | ठराव क्र. | विषय व ठरावाचा मजकूर | शेरा |
|---|---|---|---|
| ८ | ८/२ | शासकीय (सरकारी) जागा मागणी संबंधी आलेल्या अर्जाचा विचार करणे.<br>२) अध्यक्ष ज्ञानराज ग्रामविकास प्रतिष्ठान आळे यांचा जमिन गट नं.२८६१/अ मध्ये गायरान हद्दीतील संस्थेच्या शाळेसाठी ६० आर जागा मिळणे बाबतचा अर्ज.<br>सदर अर्जाचे सविस्तर वाचन ग्रामसभेत करण्यात आले. आळे ग्रामपंचायत हद्दीतील जमिन गट क्र. २८६१/१ हि सरकारी जागा असुन सदर जागेचे एकुण क्षेत्र ४ हेक्टर ४५ आर आहे. सदर ज्ञानराज ग्रामविकास प्रतिष्ठान आळे हि स्थानिक शैक्षणिक संस्था असुन सदर संस्थेचे शैक्षणिक कामकांज चांगल्याप्रकारे सुरु असुन सदर संस्थे मार्फत इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु असुन त्यामुळे ग्रामस्थांसाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळेची चांगली सुविधा झालेली आहे. संस्थेस सदर जागा मिळणे बाबत यापुर्वी ग्रामपंचायतीने वेळोवेळी ठराव संमत केलेले आहेत असे श्री. धनंजय केशव काळे - ग्रा.पं.सदस्य यांनी सांगितले त्यानुसार संस्थेची गरज लक्षात घेता गट नं.२६६१/१ या सरकारी क्षेत्रापैकी ६० आर क्षेत्र संस्थेस शैक्षणिक उपक्रमा करिता मा.जिल्हाधिकारी साहेब पुणे यांच्या पुर्व परवानगीने देण्यास हि सभा सर्वानुमते मान्यता व मंजुरी देत आहे. सदर जागेचा वापर करण्यापुर्वी मा.जिल्हाधिकारी साहेब यांच्या परवानगी घेण्यात यावी.<br>सुचकः- श्री. विलास शंकर शिरतर<br>अनुमोदकः- श्री. किशोर बापुराव कु-हाडे<br>ठराव सर्वानुमते मंजुर.<br>अस्सल नक्कल तयार दि.३१/०५/२०१८ | - |

ग्रामविकास अधिकारी
सरपंच
ग्रामपंचायत आळे ता. जुन्नर, जि. पुणे